# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature.... साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २५७ वा ❑ रविवार दि.०७ डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आणि गोंधळ

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 📖 साहित्य

स्थानिक स्वराज्य संस्था (जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका) या खऱ्या अर्थाने लोकशाहीचा पाया आहेत, कारण त्या सत्तेचे विकेंद्रीकरण करतात, थेट जनतेला निर्णय प्रक्रियेत आणतात, तळागाळातील लोकांचा सहभाग वाढवतात आणि स्थानिक गरजांनुसार विकासाला चालना देतात, ज्यामुळे खालून वर लोकशाही मजबूत होते आणि नागरिकांना शासनाचा अनुभव मिळतो मात्र महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकातील गोंधळ,पैशांचा पाऊस निवडणूक आयोगाची भूमिका बघता या निवडणुका नसून केवळ तमाशा चालला की वाटायला लागले आहे.

महाराष्ट्रात २ डिसेंबरला स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्या. यावेळी बऱ्याच ठिकाणी वाद आणि तक्रारी पाहायला मिळाल्या.कुठे मतदारांचं नावच यादीत सापडलं नाही, तर कुठे बोगस मतदारांना असं पकडल्याचा दावा करण्यात आला, तर कुठे आमदार महोदय खुद्द मतदान कक्षात महिलेला कुठलं बटण दाबायचं, हे सांगत होते.तर कुठे उभे असलेले उमेदवार निवडणूक कक्षात जाऊन गोंधळ,घालत होते.

महाराष्ट्रातील नगरपालिका निवडणुका मतदानाच्या दिवशी पैसे वाटपाच्या अनेक घटनांमुळे गाजल्या. राज्यभरात ठिकठिकाणी पैसे वाटपाचे प्रकार कॅमेऱ्यात कैद झाले. चंद्रपूरच्या राजुरात भाजपचे नेते अमोल जिल्हावार यांच्या हातात पाचशेच्या नोटांचे बंडल दिसल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला. बुलढाणा जिल्ह्यातील नांदुरा नगरपरिषदेच्या निवडणुकीत अपक्ष उमेदवारांच्या नातेवाईकांकडून पैसे वाटप केल्याचा आरोप झाला. खामगाव येथे ५० हजार रुपयांची रोखड जप्त करण्यात आली, तर धुळ्याच्या शिंदेखेडा येथेही ५० हजार रुपये पकडण्यात आले. याशिवाय, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावरही पैसे वाटपाचा आरोप ठाकरेंच्या शिवसेनेचे नेते वैभव नाईक यांनी केला. मालवणमध्ये सभेसाठी येताना शिंदेंनी दोन जड बॅगा आणल्या, ज्यात पैसे असल्याचा नाईकांचा दावा होता. शिंदेच्या शिवसेनेने मात्र त्यात कपडे असल्याचे स्पष्ट केले. एकूणच, या निवडणुकांमध्ये पैशांचा वापर मोठ्या प्रमाणावर झाल्याचे चित्र समोर आले आहे.

नगरपालिका निवडणुकीत पैशांचा महापूर येणार अशी चर्चा सुरुवातीपासूनच रंगली होती. दररोज मतदारांना मोठ्या प्रमाणात लक्ष्मी दर्शन होत असल्याच्या चर्चाही सर्वत्र होत्याच. विविध प्रभागांमध्ये दररोज जेवणाच्या पार्टी, पैशांचे वाटप, भेट वस्तूंचे वाटप सुरू असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. काही उमेदवारांनी रात्री मतदानाच्या आदल्या रात्री मतदारांना पैसे वाटपाचे नियोजन केले होते. मात्र पोलिसांची यावर करडी नजर होती. या निवडणुकीत कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी पोलिसांनी काटेकोर बंदोबस्त केला होता.दरम्यान भंडाऱ्यातमतदारांना लक्ष्मी दर्शन घडवणाऱ्या सात जणांना रंगेहात पकडून त्यांच्यावर अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली.

स्थानिक निवडणुकीत निवडणूक आयोगाची भूमिकेवर देखील प्रश्न उपस्थित होत असून आयोग सांध्याच्या भोवऱ्यात सापडली आहे.२४६ नगरपालिका आणि ४२ नगर पंचायतींच्या निवडणुकांसाठी २ डिसेंबरला मतदान आणि ३ तारखेला मतमोजणी होणार होती. आता न्यायालयाचे कारण देत १२ जिल्ह्यांत २० डिसेंबरला मतदान आणि २१ डिसेंबरला निकाल लागतील. निवडणूक आयोगाने हा ठरवून घातलेला घोळ घातल्याचा गंभीर आरोप आयोगावर होत आहे.

राज्यातील नगरपालिका नगरविकास खात्याच्या अंतर्गत येतात. तेव्हा काही निवडणुका ऐन वेळी पुढे ढकलण्याचा घोळ घालण्यामागे नगरविकास खात्याची काही भूमिका आहे का? असा सवालही सामनात उपस्थित केला. राज्य निवडणूक आयोगाने प्रचाराची सांगता होत असताना व मतदानाची तयारी सुरू असताना निवडणुका पुढे ढकलल्या जाव्यात, हे संशयास्पद आहे. मराठवाडा, विदर्भ, नाशिक, पुणे भागातील महत्त्वाच्या नगरपालिका आणि नगर पंचायती यात आहेत.

या सर्व प्रकारात सरकार व प्रशासनाची भूमिका देखील संशययातीत आहे. सत्ताधारी पक्ष म्हणेल तीच दिशा खरी..असा प्रकार स्थानिक निवडणुकात दिसून आला.सरकारने प्रभाग रचनेचा घोळ घालून निवडणुका लांबणीवर नेल्या.राज्यातील काही नगरपालिका आणि नगर पंचायतींच्या निवडणुका मतदानाच्या एक दिवस आधीच पुढे ढकलण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला. आयोगाच्या या भूमिकेशी राज्य शासन असहमत असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले.मात्र विरोधी पक्ष सरकारवर तोंडसुख घेत आहे.

एकंदरीत काय तर

स्थानिक शासन हे लोकशाहीचे प्राथमिक केंद्र आहे, जिथे लोकांसाठी, लोकांद्वारे या लोकशाही तत्त्वांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होते.मात्र आज स्थानिक शासन कमकुवत करण्याचा प्रयत्न केला जात आहे.स्थानिक शासन कमकुवत करू नये कारण ते लोकशाहीचा पाया आहेत, नागरिकांना निर्णय प्रक्रियेत थेट सहभागी करतात, आणि शाळा, आरोग्य, पाणी, स्वच्छता यांसारख्या मूलभूत गरजांची पूर्तता करतात; त्यांना पुरेसे अधिकार, निधी आणि संसाधने न दिल्यास किंवा निवडणुका पुढे ढकलल्यास ते कमकुवत होतात आणि त्याचा थेट परिणाम जनतेच्या जीवनावर होतो, ज्यामुळे विकासाचे चक्र थांबते व हुकूमशाही प्रवृत्ती वाढतात, म्हणून त्यांना सक्षम करणे आवश्यक आहे.

# संविधानानुसार समाजनिर्मिती व्हावी हेच ध्येय असले पाहिजे – डॉ. रमेश माधवराव पांडव

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**पुणे –** “संविधानानुसार समाजनिर्मिती हीच आपली दिशा आणि ध्येय असयाला पाहिजे असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात डॉ.रमेश पांडव यांनी केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वतीने विशेष व्याख्यानाचे आयोजन संत ज्ञानेश्वर सभागृहात करण्यात आले होते. त्याप्रंसगी ते बोलत होते. यावेळी प्र – कुलगुरू प्रा. डॉ. पराग काळकर यांनी विद्यापीठ परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते डॉ. रमेश माधवराव पांडव, व्यवस्थापन परिषद सदस्य रविंद्र शिंगणापूरकर, अधिष्ठाता प्रा. (डॉ.) विजय खरे, डॉ. संजय तांबट, अधिसभा सदस्य शंतनू लामदाडे, प्रा. (डॉ.) राजेंद्र घोडे, प्रा. (डॉ.) विलास आढाव, डॉ. संजय देसले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे प्रमुख डॉ. सुधाकर बोकेफोडे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासनाचे प्रमुख डॉ. सुनिल भंडगे, डि. एस. सावकार अध्यासनाचे प्रमुख डॉ. अशोक कांबळे, प्रा. (डॉ.) राधाकृष्ण पंडित आदी मान्यवरांनी पुष्पांजली अर्पण आदरांजली वाहिली. याप्रसंगी विविध शैक्षणिक व



प्रशासकीय विभागांचे विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर सेवक, विविध कर्मचारी आणि विद्यार्थी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात विशेष व्याख्यानासाठी आमंत्रित प्रमुख वक्ते डॉ. रमेश माधवराव पांडव यांनी राष्ट्रपुरुष : डॉ. बाबासाहेब या विषयावर व्याख्यान दिले. त्यांनी महापुरुषांचे स्मरण म्हणजे इतिहास पठण करणे नाही तर बाबासाहेबांने आपल्याला दिलेल्या संविधानानुसार समाज उभारण्याची दिशा ठरवण्याचा क्षण आहे.” त्यांच्या मते, सामाजिक समता, आर्थिक स्वावलंबन, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवी मूल्ये ही संविधानाची तत्त्वे प्रत्येकाने आपल्या प्रत्यक्ष कृतीत आणणे हीच खरी महापरिनिर्वाण दिनाची कृतज्ञ आठवण असल्याचे यावेळी सांगितले. आपल्या अनुभवातून समाजातील विषमता अधोरेखित करत त्यांनी सेवा वस्त्यांचे वास्तव आणि गरिबीचे कटू चित्र मांडले. पुणे, नाशिक आणि संभाजीनगरातील शेकडो सेवा वस्त्यांचा उल्लेख करत “अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य आणि संस्कार या प्रत्येक भारतीयाच्या मूलभूत गरजा आहेत; एका कुटुंबालाही उभे केल्यास समाज उभा राहतो,” असे ते म्हणाले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा संदर्भ देत जातव्यवस्थेचा इतिहास, तिच्या विघटनातील अडथळे, आणि परिवर्तनासाठीची दोन उपाययोजना व्यवसायबदल व आंतरजातीय विवाह यावरही त्यांनी स्पष्ट आणि मार्मिक भाष्य केले. “भिंती मोडल्या शिवाय एकसंघ भारत घडणार नाही,” या बाबासाहेबांच्या संदेशाचे स्मरण त्यांनी उपस्थितांना करून दिले.“महापुरुषांची जयंतीपुण्यतिथी म्हणजे परंपरेची पूर्तता नव्हे; ती आपल्या कृतींचा आढावा घेण्याची वेळ आहे. भेदभाव कमी करण्यासाठी, समाज बदलण्यासाठी आणि स्वतः च्याही भविष्याची दिशा ठरवण्यासाठी प्रत्येकाने एक ठोस ध्येय निश्चित केले पाहिजे.” असे डॉ. पांडव यांनी विद्यार्थ्यांना आवाहनही केले.

“महापुरुषांचे स्मरण ही परंपरा नसून आपल्या कृतीचे आणि कर्तव्यभावनेचे वर्षभराचे आत्मपरीक्षण आहे. बाबासाहेबांचे विचार भावना जागवण्यासाठी नव्हे, तर कृतिशील होण्यासाठी आहेत. आपण ठरवलेला सामाजिक टप्पा वर्षात पूर्ण झाला तर आनंद; न झाल्यास ‘का नाही?’ याचा प्रामाणिक विचार व्हावा. बाबासाहेबांचे २५ नोव्हेंबर १९४९ चे भाषण आणि त्यांचा ‘प्रथम भारतीय, अंतिम भारतीय’ हा संदेश आपल्या दैनंदिन कृतीत उतरला तरच स्मरणाला अर्थ प्राप्त होतो. मूर्तिपूजन नव्हे, तर विचारांचे आचरणयातूनच खरे परिवर्तन आणि संविधानानुसार समाजनिर्मिती शक्य आहे.” असे व्यवस्थापन परिषद सदस्य रविंद्र शिंगणापूरकर यांनी यावेळी उपस्थितांना संबोधित करतांना सांगितले. याप्रसंगी उपस्थितांनी बुद्धवंदनेने बाबासाहेबांना अभिवादन केले. अधिष्ठाता डॉ. संजय तांबट यांनी उपस्थितांना प्रमुख वक्त्यांचा परिचय करून दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन जाधव यांनी केले तर कार्यक्रमाचा समारोप भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासनाचे अध्यासनप्रमुख डॉ.सुधाकर बोकेफोडे यांनी केले.

# विदेशात मराठी शिक्षण प्रशिक्षण – योजना कागदावरच

**त्यासाठी विदेशात केलेल्या दौऱ्यांची माहिती मात्र देण्याचे मराठी भाषा विभागाने टाळले.**

**झाला केवळ एक एम ओ यू, त्यानुसार काम नाहीच.**

**अर्जदारालाच माहितीसाठी खेटे घालायला लावत माहिती अधिकार कायद्याची अवहेलना.**

ज्योतिर्मय 📖 साहित्य

मोठा गाजावाजा करत, महाराष्ट्र सरकारने विश्व मराठी संमेलने ही विदेशात, मराठी भाषा शिक्षण प्रशिक्षण याची सोय करण्यासाठी, मराठी उद्योजकांच्या संधी वाढवण्यासाठी सुरू केल्याचे घोषित करून चार वर्षे होत असली तरीही व मराठी भाषा मंत्री आणि मराठी भाषा विभागातील अधिकारी यांनी नुकतेच अनेक विदेश दौरे त्यासाठी करून झाले असले तरीही अद्याप विदेशात कुठेही मराठी भाषा शिक्षण प्रशिक्षणाची सोय व सुरूवात झालेली नसल्याचे धक्कादायक वास्तव माहिती अधिकारात प्राप्त माहितीतून समोर आले आहे.

उपराजधानीतील माहिती अधिकार कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी मराठी भाषा विभागाकडे या संबंधात, ज्या कोणत्या संस्थांसोबत एम ओ यू करण्यात आले त्यांची माहिती व प्रत, त्यानुसार कुठे कुठे मराठी भाषा शिक्षण प्रशिक्षणाची सोय झाली, त्यांचे स्वरूप इ.ची तपशीलवार माहिती, तसेच या व अन्य कोणत्याही तत्सम कामासाठी विदेशात कोण, कोणत्या ठिकाणी, कोणकोणत्या पदांवरील कोणत्या अधिकाऱ्यांनी किती भेटी दिल्या याची, त्यावर आजवर करण्यात आलेल्या खर्चाची तपशीलवार माहिती मागितली होती.

मराठी भाषा मंत्री आणि मराठी भाषा विभागातील अधिकारी यांनी जपान व तत्सम देशांचे जे दौरे या कामांसाठी केल्याची जी वृत्त प्रसिद्ध झाली होती त्या पार्श्वभूमीवर ही माहिती त्यांनी मराठी भाषा विभागाकडे मागितली होती. ती देण्याचे मराठी भाषा विभागाने टाळून, संबंधित अर्ज शालेय शिक्षण विभागाकडे पाठवून हात झटकले होते.

शालेय शिक्षण विभागाने देखील तो अर्ज राज्य शैक्षणिक व संशोधन परिषदेकडे पाठवून हात झटकले.

राज्य शैक्षणिक व संशोधन परिषदेने देखील त्यातील

तपशीलासाठी महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ यांच्याकडून ते प्राप्त करवून म्हणत हात झटकले.

त्यांनी केवळ इंडोगावा इंडिया कल्चरल सेंटर आणि

शालेय शिक्षण विभाग यांच्यात ३१ जानेवारी, २०२४ रोजी झालेल्या एका एम ओ यूची प्रत तेवढी उपलब्ध करून दिली.

जी माहिती ज्यांना विचारली गेली त्या मराठी भाषा विभागाने देण्याचे टाळले, ज्यांना ती विचारलीच नाही त्या राज्य शैक्षणिक व संशोधन परिषदेच्या अधिकाऱ्यांनी विदेशात भेटी दिल्या नाहीत, अशी न विचारली गेलेली, दिशाभूल करणारी माहिती देत, प्रत्यक्षात विदेशात भेटी कोणी दिल्या हे सांगण्याचे मराठी भाषा विभागासह शैक्षणिक, संशोधन परिषदेने देखील टाळले आहे.

संबंधित एम ओ यू मध्ये म्हटलेले देखील कोणतेच काम झाल्याची कोणतीही माहिती पुरवण्यात आलेली नाही.

त्यामुळे विदेशातील मराठी शिक्षण प्रशिक्षणाची सोय प्रत्यक्षात कुठेच न केली जाता ती योजना नुसतीच कागदावरच व ती देखील एकाच संस्थेसोबत झालेल्या सहमती ज्ञापनापलीकडे पुढे सरकलेली नाही हे स्पष्ट होते आहे.

सरकार जनतेचे कोट्यवधी रूपये उधळत तीन दिवसांचे संमेलन घेते, त्यांच्या खर्चाचेही हिशेब देत नाही, विदेशात मराठी शिक्षण प्रशिक्षण व त्यासाठी विदेश दौरे तेवढे करत अधिकची पैशांची उधळण करते, त्याबाबत मागितलेली माहिती न देताही केवळ दिशाभूल करते हे सारे निषेधार्ह आहे, माहिती अधिकार कायद्याची ही अवहेलना आहे, मागितलेली माहिती कायद्यानुसार संबंधितांकडून मागवून अर्जदाराला पुरवणे हे मराठी भाषा विभागाचे काम असताना ते कायद्याची अवहेलना करत अर्जदारालाच निरूत्साहित करण्यासाठी इथे तिथे पाठवते हे सारेच उद्वेगजनक आहे असे अभय कोलारकर यांनी म्हटले आहे.

न पुरवण्यात आलेली माहिती मिळवण्यासाठी मराठी भाषा विभागातील अपिलीय अधिकारी यांचेकडे अपील करणार असल्याचे अभय कोलारकर यांनी सांगितले.

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख-११०




*आपण आपल्या लेखमालेच्या अखेरच्या टप्प्यात आलेलो आहोत. थेट कांही विशेष रंगांचं महत्त्व जाणून घेत आहोत. आपण ज्या वास्तूमध्ये रहातो, आपला जो व्यवसाय वा नोकरी आहे, आपली कंपनी, इंडस्ट्री असेल एकुणच आपली, एक विशिष्ट 'ओळख' असेल आधुनिक जगतात...!! तर आपल्याला रंग शास्त्राच्या अचुक मदतीने, प्रगतीचा मार्ग, स्वांतसुखाय दिनचर्या आणि स्वप्न पूर्तीला मूर्तस्वरुपात खरच पाहण्याचा अनुभव घेता येतो....!!*

*एरवी आपलं दैनंदिन धावपळीतलं जीवन आपण जगतच असतो. नोकरदार किंवा व्यावसायिक.... दोघांच्याही दैनंदिनीत थोड्या फार फरकाने साम्य असतेच. सकाळीच नोकरीच्या ठिकाणी वेळेत पोहोचणं, प्रलंबित आणि नवीन कामे यांचा बोजा, घरची कामे कौटुंबिक जबाबदाऱ्या- घरच्या वयोवृद्धांची काळजी, मुलांचे अभ्यास, जर दोघेही पती-पत्नी नोकरी वा व्यवसायात व्यग्र व्यस्त असतील तर मुलांकडे होणारं दुर्लक्ष, कर्ज, कर्जाचे हप्ते, देणे दार आणि बरंच काही....! या साऱ्या प्रश्नांना, कर्तव्यांना सामोरे जावं लागत असतं."*

*यातून उद्भवणारे शारिरिक आजार,मानसिक आजार केव्हा शरिरात घर करतात, कळत पण नाही. या साऱ्यांवर रंगशास्त्र- रंग चिकित्सा आणि 'वास्तुशास्त्र पेंटींग' आपल्याला फार दिलासा देतं. कारण...*
*रंग आणि रंगाकार जे विशिष्ट खास बनवून घेतलेल्या 'वास्तुशास्त्र पेंटींग 'आपण आपल्या वास्तुत, भिंतीवर लावतो, तेव्हा थकून भागून आलेले आपण आपल्या वास्तूत 'पेंटींग' असलेल्या हॉल वा खोली वा बैठक रूम मध्ये विश्रांतीसाठी बसतो अन् सहजपणे या 'वास्तुशास्त्र पेंटींग' कडे आपण जेव्हा पहातो, तेव्हा खास आपल्या साठी घेतलेले/बनवलेले ते पेंटींग सुध्दा आपल्याकडे पहातच असते. त्या पेंटींग मधील "सकारात्मक" रंगाकार-प्रतिके, त्या पासून निघणारी तेजो किरणे, आपल्या डोळ्यांच्या 'रेटीना' व्दारे, थेट मेंदू पर्यंत पोहोचतात. आणि रंगज्ञान 'झाल्यामुळे आपल्याला, समोरचे 'वास्तुशास्त्र पेंटींग' दिसते.आपणाला आपल्या अनाकलनीय प्रश्नांना पर्याय मिळायला परिस्थिती निर्माण होऊ लागते.*

क्रमश :

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




## जात्यावरच्या ओव्या.....

नको जाऊस माहेरा
बिना मुर्हाळ्याची
चटणी आपल्या घराची
मानापानंन खायची ||३८३||

जाऊन माहेरा
नको भांडु-तंडु बापा
माझा वडील बंधू
त्याला लागतील धापा||३८४||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## माती भिडली आभाळा...




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

**ज्योतिर्मय साहित्य**

मंदिरात प्रवेश केला की उजव्या बाजूला प्रथम दर्शन घडते ते शिवलिंगाचे. नंतर ज्ञानेश्वरांनी ज्या खांबाला ( पैस ) टेकून ज्ञानेश्वरी सांगितली तो पैसाचा पवित्र खांब. आणि त्याच्या शेजारी असलेल्या भागात संत ज्ञानेश्वर, जगद्गुरू संत तुकाराम महाराज आणि ज्यांनी ज्ञानेश्वरी उतरवून घेतली ते सच्चिदानंदबाबा यांच्या सुंदर मूर्ती आहेत.

पूर्वी ज्ञानेश्वरांनी जेव्हा ज्ञानेश्वरी लिहिली, तेव्हा या ठिकाणी करवीरेश्वराचे मंदिर होते. तेथील खांबाला टेकून ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी सांगितली.


शके बाराशे बारोत्तरे । तैं टीका केली ज्ञानेश्वरे ।
सच्चिदानंदबाबा आदरें । लेखकु जाहला ।।

अशी ही तेराव्या शतकात लिहिलेली ज्ञानेश्वरी. काळाच्या ओघात ते करवीरेश्वराचे मंदिर नष्ट झाले पण माऊलींनी ज्या खांबाला टेकून ज्ञानेश्वरी सांगितली, तो खांब मात्र तसाच राहिला. त्या खांबानं जणू आभाळ पेललं. आभाळ पेलण्याइतका तो उंच झाला. माऊलींनी त्याला टेकून ज्ञानेश्वरी सांगितली. ज्ञानेश्वर म्हणजे आभाळच. ज्ञानेश्वरी म्हणजे सुद्धा आभाळ. इथला खांब हा पृथ्वीवरल्या मातीचेच प्रतीक. पण ही माती ज्ञानदेवांच्या पावन स्पर्शाने एवढी पुनीत, एवढी विशाल झाली की ती आभाळाला भिडली. म्हणून मला शांताबाईंच्या अजब सोहळा, माती भिडली आभाळा या गाण्याच्या ओळी आठवल्या.


तो खांब तरी किती भाग्यवान म्हणायचा ! अखिल विश्वाला वंदनीय असलेल्या ज्ञानेश्वर माऊलींनी त्याचा आधार घेतला. तो त्यांच्या स्पर्शानं पावन झाला. आपली कठोरता त्यानं त्यागली आणि माऊलींच्या व्यक्तिमत्वातली शीतलता, पावित्र्य धारण केलं. महाराष्ट्र ही संतांची भूमी. इथल्या मातीचा कण न कण त्यांच्या पदस्पर्शाने पावन झाला आहे. इथल्या शिळा सुद्धा पवित्र आहेत. उगीच नाही गोविंदाग्रजांनी उगीच नाही

मंगल देशा पवित्र देशा महाराष्ट्र देशा
प्रणाम घ्यावा माझा हा श्री महाराष्ट्र देशा
राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा
नाजूक देशा, कोमल देशा, फुलांच्याही देशा

असे सुंदर महाराष्ट्राचे वर्णन केले ! इथले दगडही पावन आहेत. हा खांब तर एवढा पवित्र की पुढे त्याच्याभोवती मंदिर उभारले गेले. एरव्ही मंदिरात खांब असतात, पण खांबासाठी मंदिर उभारले जावे हा ही एक अजब सोहळा . त्याचं कारणच तसं आहे. ज्या ज्ञानेश्वरांची पाठ समाधीस्थानीही जमिनीला टेकली नाही, त्याची पाठ या खांबाला टेकली. प्रख्यात लेखिका दुर्गा भागवत आपल्या पैस या पुस्तकात त्याबद्दल बोलताना म्हणतात, ख्रिस्ती धर्म जसा जगभर पसरला, तसा वारकरी पंथ पसरला असता,तर ख्रिस्ताच्या क्रुसाप्रमाणे हा स्तंभही जगभर गेला असता. पण बरे झाले तसे नाही झाले ते. तो इथेच राहिला. वारकऱ्यांना त्याचे दर्शन घ्यायला इथेच यावे लागते. ज्ञानेश्वरी इथे सांगितली गेली म्हणून वारकरी संप्रदायाचे हे आद्य पीठ आहे. **(क्रमशः)**




## दासबोध स्तवन





उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## सगुणभजन

**ज्योतिर्मय साहित्य**

दशक ६, समास ७
नमस्कार


आठ दिवसाच्या गॅप नंतर आज ''दासबोध''निरूपण लिहायला घेतले. दररोज आपले काही तरी चुकत आहे याची सतत जाणीव होत होती पण समर्थांनी सांगितले आहे की ''आधी प्रपंच करावा नेटका'' या वाक्याने अंगात शक्ति येत होती गणपती गौरीच्या आगमनाची तयारी व सण यामुळे लिहायला विलंब झाला सर्वाची क्षमा मागते व सगुणभजनया समासाच्या समारोपाकडे येते. आपण आता पर्यन्त अभ्यासलो आहोत की मी कर्ता असे कधीही म्हणू नये. माझ्या हातून जे जे कर्म झाले ते ते ईश्वरेच्छा होती, परमात्म्याने माझ्या कडून ते कार्य करून घेतले असे मानले पाहिजे. नाही तर समाजातील काही लोक.स्वतः कडे असे कर्तेपण घेतात की चंद्र सुर्य पण माझ्या सांगण्या वरून प्रगट होतात व मावळतात. असे बढाईखोर लोकांच्या बुध्दीची कीवकरावीशी वाटते. असे बाता मारणारे लोक आपण आजुबाजुला पहातो.

सगुणभजन या समासात समर्थानी असे सांगितले आहे की ''ईश्वर कर्ता आहे'' या भावनेने वागले तर भगवंत आपल्याला आशिर्वाद देतो.

भगवंत शाश्वत आहे त्याच्या पेक्षा आपले जीवन किती अल्प आहे. भगवंताची महती किती मोठी त्या मानाने मी किती लहान आहे याची जाणीव ठेवावी. कितीही मोठे झाले तरी उपासना सोडू नये. मी तर असेही वाचले आहे की भारतरत्न सचिन तेंडुलकर व त्याचे कुटुंबातील सदस्य मनाचे श्लोक म्हणतात. म्हणजेच सर्वोच्च स्थानात पोहचला तरी आपल्या गुरूंना विसरू नये. खरें म्हणजे उपासनेने दृश्याचें मिथ्यापण लक्षात येते आणि आपली देहबुद्धी संपते. ती संपू नये म्हणून देहाला उपासना लावावी आणि विवेकाने ''मी ''पणा मारावा किंबहुना तो संपवून अध्यात्माची कास धराली की खरे आत्मज्ञान उदय पावते. शेवटच्या पाच ओव्यात समर्थ काय उपदेश करतात ते आता पाहूयात. या प्रचंड विश्वामध्ये भगवंत सर्व व्यापी आहे. भगवंताच्या शक्तिने आपण कार्य करतो,जगतो कर्म करतो आपल्या वाट्याला आलेले चांगले वाईट भोग भोगतो आपली नितीमत्ता चांगली असेल तर वाईट परिस्थिती आली तरी त्याच्यावर मात करून चांगले ध्येय गाठतो. कारण सगुणोपासना आधी चांगली केली असल्याने वाईट परिस्थिती निर्माण झाली तरी तो डगमगत नाही.आपली ऊच्चध्येयमुल्ये सोडत नाही. म्हणून सततची उपासना हवीच. ''मी ज्ञानी आहे''अशा मोठेपणाची भावना ठेऊन कोणी ईश्वराच्या उपासनेला तुच्छ लेखत असेल तर त्याचा परिणाम त्याला भोगावा लागेल. ते ज्याचे त्याने पाहुन घ्यावे. देह सगुणाच्या उपासनेत गुंतलेला ठेवायचा, ''मी''पणा विवेकाने नाहीसा करायचा. सत्पुरूषाच्या जीवनात अशी ही आत बाहेर अवस्था असते. देहाने भगवंताचे भजनपूजन आणि मनाने स्वस्वरूपाशी अनुसंधान हा तर संतजीवनाचा मुळ गाभा आहे. तो जर तुमचा पक्का असेल तर ''समाधी साधन संजीवन नाम''साधण्यास वेळ लागणार नाही. मात्र त्यासाठी एक मात्र खरे लक्षात ठेवले पाहिजे आपलेच आचारविचार, वाणी, यावर नियंत्रण असणे गरजेचे आहे. भगवंताच्या उपासनेने सगुणोपासना जपावी वाढवावी आपल्या व्यवहारी जगात आमलात आणावी.

श्री,राम जय राम जय जय राम
जय जय रघूवीर समर्थ
समास ७वा समाप्त

## जेथे भगवंताचें नामस्मरण तेथे सर्व संतांचें ठाण



**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

**ज्योतिर्मय साहित्य**

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ।। परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ।। जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ।। विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ।। मान, अपमान, जगाचे सुख-दुःख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ।। अभिमानात परमात्म्याचे विस्मरण। हें जीवपणाचें मुख्य लक्षण।। सुख-दुःख, विपत्ति - आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती।। आत्मनिश्चय बाणल्यावांचून। माया न हटे न सुटे जाण।। आता करी शूर मन। मायेसी हटवावे आपण।। जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें।। एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान।। ज्याच्यांत मानावें मी सुख। त्याच्यातच उद्भवतें दुःख।। नराचा होय नारायण। जर न चुकला मार्ग जाण।। जेथे ठेवावी आस। त्याचे बनावें लागतें दास।। देह तो पंचभूतांचा। त्याचा भरवसा न मानावा फारसा।। मी तुम्हांस सांगतों हित। दृश्यांत न ठेवावें चित्त।। दृश्य वस्तु नाशिवंत असते। भगवत्कृपेने समाधान येतें।।

परिस्थिति नसे बंधनास कारण। असे आपलेच मनाची ठेवण ।। देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण।। विषयाचा नाही झाला जोंवर त्याग। तोंवर रामसेवा नाही घडत सांग।। आपलें आत्यंतिक हित। हेंच खरा स्वार्थ जाण।। चित्तीं जे विषयापासून सुटले। ते आनंदासी आले।। रामनाम प्रेमयुक्त चाले धणी। त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ।। द्रव्यदारावर्जित जाण। ही खरी संताची खूण।। सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी। त्याला नाही दुसरी सरी ।। आल्यागेल्यास द्यावे अन्नदान। मुखानें भगवंताचें नाम। हृदयांत रामाची प्रीति। यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ।। न धरावी जगाची आस। तोच होऊ पाहे रामदास।। नामांत संत । नामीं भगवंत ।। वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेंच संताचें मुख्य लक्षण जाण ।। जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण।। अगरबत्ती जळून गेली। परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन । तेच खरे जिवंत जाण ।। संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति । भगवन्नामानें साधते ।। देहासकट माझा प्रपंच । रामा केला तुला अर्पण ।। ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ।।




**ज्योतिर्मय साहित्य**

काल माऊलींच्या चरणी नांदेडच्या एका भक्ताने एक कोटी रूपयांचा रत्नजडीत मुकूट अर्पण केला त्या माउलींना एके काळी दोन वेळचा घास मिळत नव्हता रहायला आसरा नव्हता. संन्यासाची लेकरे म्हणून सतत हेटाळणी सहन करावी लागली अशा

श्रीसंत ज्ञानेश्वर माऊली, माऊलींच्या जीवनपटा विषयी

मित्रांनो आपल्या मृत्यूचा सोहळा साजरा करणारा हा देवांचा देव ज्ञानोबाचं करू शकतो. कारण आपण सर्व सामान्य माणसं माणसं मृत्युचं नाव जरी काढलं तर अंगावर काटा येतो.

माझ्या नंतर माझ्या घरादाराचं काय होईल?

माझी मुलंबाळं व्यवस्थित रहातील का?असे एक ना अनेक प्रश्न तुमच्या माझ्या सारख्या सर्व सामान्यांना पडतील?

पण विश्वाचे आर्त मनामध्ये ठसवणाऱ्या पसायदानाने लहानपणापासून हरिपाठ विठ्ठल भक्ति व विचारांच्या सानिध्यात लहानाचे मोठे झालेल्या माउलीला मृत्यूचें भय कसले ? म्हणून कसलेही भय न बाळगता एक तरी ओवी अनुभवावी. हा संदेश माऊली देतात.

कापुराची वाती उजळली ज्योति ।
ठायींच समाप्ति झाली जैशी ।

आपल्या कर्तृत्व, श्रेष्ठत्व,व दातृत्व भारतीय संस्कृती व साहित्य सर्वदूर पोहचवणारी माऊलींच्या कार्यकाळा विषयी या लेखात थोडक्यात मांडण्याचा प्रयत्न करते.

ज्ञानराज माऊली बद्दल थोडक्यात लिहिणे म्हणजे. मला माऊली काहीचं समजले नाही असे वाटते. कारण अशा थोर विभूती महात्म्यांचा अभ्यास एका जन्मात होणे शक्य नाही. तरी हा अल्पसा प्रयत्न केला आहे.

पैठण जवळील आपेगावात गोदावरीच्या काठावर ज्ञानेश्वरांचे पूर्वज हरिहरपंत रहात होते. त्यांचा चार नंबरचा मुलगा त्र्यंबक त्यांनी संन्यास घेतला होता. त्र्यंबकपंतांच्या मुलांचे नाव गोविंदपंत. गोविंदपंतांचा विवाह देवकुळे कुलातील निराबाई या अत्यंत सात्विक, सोज्वळ कन्येशी झाला. त्याकाळच्या कालमाना प्रमाणे अत्यंत साधी रहाणी पण संपूर्ण कुटुंबाला आधार देणारी स्त्रि पतिनिष्ठा प्राणापलीकडे जपणारी भारतीय स्त्रियांचे मुर्तिमंत उदाहरण म्हणून निराबाई कडे पाहिले जाते.

खाण तशी माती या मातीचा सुगंध आज माऊलींच्या रूपाने आपण अनुभवत आहोत म्हणून

घराघरात ज्ञानेश्वर जन्माला यावेत. एकतरी ओवी अनुभवावी, पुढे त्यांना पुत्ररत्न प्राप्त झाले, त्यांचे नाव विठ्ठल ठेवण्यात आले.

विठ्ठलाचे मौजिबंधन झाल्यावर त्यांनी शास्त्राभ्यास सुरू केला. अतिशय विद्वान ब्राह्मण म्हणून पैठणच्या विद्वत सभेत विठ्ठल पंत सर्वमान्य होते.

आपण जन्म कुणाच्या पोटी घ्यावा हे आपल्या हातात नसते पण विठ्ठलपंत जन्माने व कर्माने पण ब्राह्मण होते. यच्चंयावत विद्वत्ता त्यांच्या नसानसांत होती.

अठरा पुराणे साही शास्त्र वेदविद्या त्यांना मुखोद्गत होती. आपल्या ज्ञानात भर पडावी म्हणून ते तिर्थाटन करत करत म्हणजे सोरटी सोमनाथ, काशी, गया मुचकुंद गुंफा धवलपूर करत करत ते त्र्यंबकेश्वर नाशिक येथे आले. पुढे भिमाशंरचे दर्शन घेऊन ते आळंदीला आले. विठ्ठलपंत इंद्रायणीच्या काठी आले खरे पण आपल्या नेमधर्मा नुसार दररोज स्नान संध्याकरत आळंदीत रहात होते. हा तेजःपुंज अतिथी हा तेजस्वी पुरुष आहे तरी कोण? चेहऱ्यावर असलेली विद्वत्ता व शुध्द पवित्र आचरण पाहून आळंदीचे रहिवासी असलेल्या श्री,सिध्देश्वर कुलकर्णी यांच्या नजरेतुन हा योगीपुरूष सुटला नाही.

**(क्रमशः)**




## दात दुखी / दाढ दुखी वर काही उपाय

**ज्योतिर्मय साहित्य**

दातदुखीपासून लगेच आराम हवा असेल तर पेरूची पानं चावावीत अथवा पेरूची झाडाची पानं पाण्यात उकळून त्या पाण्याने चूळ भरावी. यामुळे तुमची दातदुखी तर बंद होतेच पण त्याचबरोबर हिरड्यांमधील सूज आणि त्रासदेखील बंद होतो.

तुमच्या दातामध्ये दुखत असल्यास, त्या ठिकाणी कच्च्या कांद्याचा तुकडा ठेवावा. त्यामुळे पटकन दातदुखी बंद होते.. आंबट पदार्थ खाल्ल्याने होणा-या कळा थांबतात. दात दुखणे कमी होते.

दातदुखीसाठी हिंगाचा वापर अतिशय फायदेशीर ठरतो. त्यासाठी तुम्ही एक ग्लास पाणी घ्या. त्यामध्ये दोन चिमूटभर हिंग आणि एक चिमूटभर सैंधव घालून उकळून घ्या. पाणी कोमट झाल्यानंतर या पाण्याने तुम्ही चूळ भरा. त्यामुळे लगेच दातदुखी बंद होईल.

दाताला कीड लागली असेल आणि त्यामुळे तुमचे दात दुखत असतील तर दोन चिमूट सैंधवमध्ये तिळाचं तेल घालून ही पेस्ट कीड लागलेल्या दाताला लावा. असं केल्यास, तुमच्या कीड लागलेल्या दातातील वेदना थांबतील.

दातदुखीसाठी लसूनदेखील एक चांगला उपाय आहे. लसणाची एक पाकळी दाताखाली दाबून ठेवावी. काही वेळातच दातामध्ये येणारे वेग कमी होतील.

प्रत्येकाच्या घरात बटाटे तर असतातच. तुमच्या दातांमध्ये दुखत असल्यास आणि सूज आली असल्यास, बटाटा कापून त्याचे स्लाईस करून त्या भागावर साधारण २० मिनिट्स ठेवा. लगेचच दुखणं बंद होईल.

दातदुखीपासून सुटका होण्यासाठी तुम्ही टी - बॅगचादेखील वापर करू शकता. गरम पाण्यात टी बॅग्ज ठेवा आणि तुमच्या दातदुखीच्या ठिकाणी शेका. यामुळे दुखणे कमी होईल.

दातामध्ये खूप जास्त दुखत असेल तर २० ते २५ मिनिटांपर्यंत बर्फ त्याच दातावर शेकवा, जिथे दुखत आहे. असं केल्यामुळे तुम्हाला लवकर सुटका मिळेल.

लिंबामध्ये जास्त प्रमाणात विटामिन सी असतं. दात दुखत असलेल्या ठिकाणी लिंबाचा थेंब लावल्याने लगेचच तुमचं दुखणं थांबेल.

दात दुखत असल्यास, ब्रँडीचादेखील उपयोग केला जातो. तुमच्या घरी ब्रँडी असल्यास, कापसावर थोडी घेऊन दुखणाऱ्या दातावर लावा. तुमचं दुखणे दूर होईल.

तुमचा जो दात दुखत आहे, त्यावर कापूर लावा. कीड लागल्याने दात दुखत असल्यास, त्या ठिकाणी कापूराचा चुरा भरा. दुखण्याबरोबर त्या कीड्यापासूनदेखील सुटका मिळेल.

दातदुखीसाठी आलं देखील खूपच लाभदायी आहे. आल्याचे छोटे छोटे तुकडे करून त्यावर सैंधव घाला. ज्या दातामध्ये दुखत आहे, तिथे आल्याचा तुकडा दाबून धरा. या दरम्यान तोंडात जे पाणी येईल, ते न गिळता थुंकत राहा. त्यामुळे दातदुखी ५ ते १० मिनिटांत बंद होईल.

लवंग ठेचून त्यात लिंबाचा रस घाला आणि दिवसातून दोन ते तीन वेळा दुखत असलेल्या दाताला लावा.

दातदुखीपासून सुटका मिळण्यासाठी फिटकरी पावडर दुखत असलेल्या ठिकाणी लावा. असं केल्यामुळे तुम्हाला दातदुखीपासून मुक्ती मिळेल.

दातदुखीची समस्या असल्यास, कडूलिंबाची तीन- चार पानं धुऊन घ्या. हे कडू असतं पण तरीही दातदुखीसाठी ही पानं चावा. यामुळे तुमचा त्रास बंद होईल.

जर आपण भूक लागल्यावर वेळेवर अन्नग्रहण नाही केले तर काय होते...

**(क्रमशः)**

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९



## लघु बोधकथा

### कसाई

*श्रद्धा बकरीला आपल्या बाळाची चिंता होती. बाळ मोठं झाल्यावर त्याला कापायला नेतील. ती काय करावे याचा विचार करीतच होती. अशातच कसाई आला. त्यानं तिच्या बाळाला पाहिलं. तिला राग आला. काय करावे सुचेनासं झालं. अशातच तिला आठवलं. आपल्याला शिंगे आहेत. शिंगाचा योग्य वापर करायला हवा. तिचा तो विचार. ती विचारच करीत होती. एवढ्यात श्रद्धानं आपली अगाढ ताकद लावून त्याच्या पोटात आपली शिंग खुपसली. तसा कसाई खाली पडला. रक्त वाहू लागलं व तो क्षणातच गतप्राण झाला.*

*बोध- मुक्या प्राण्यांना त्रास देवू नये.*

# बोलणारं घर...

**ज्योतिर्मय साहित्य**

दिवस थंडीचे होते. या दिवसांत लवकर अंधारसुद्धा पडतो ना. अशाच थंडीच्या दिवसांत एका दुपारी मला अचानक परगावी जावं लागलं आणि यायला रात्रीचे आठनऊ वाजणार होते. प्रश्न होता तो सहा साडेसहाच्या दरम्यान शाळेतून घरी परत येणाऱ्या कृष्णाचं काय करायचं हा. त्यावेळी कृष्णा नऊ वर्षांचा असेल संध्याकाळच्यावेळी घरात स्वागताला आई नाही हे त्यानं बरेचदा अनुभवलं होतं. पण ते अगदी थोड्या वेळासाठी. यावेळी मी परगावी जाणार असल्याने मलाच अपराधी वाटत होतं. मी त्याच्यासाठी त्याच्या आवडीचा बेत बनवला. त्याच्या शाळेत फोन केला आणि फोनवर त्याला सगळं नीट समजावून सांगितलं. मात्र रात्री परत येण्याचा माझा अंदाज चुकला आणि मला यायला दहा वाजले. घरात आले तेव्हा कृष्णाने स्वतःची गादी घातली होती आणि आरामात एका खेळण्याशी खेळत बसला होता. मला बघताच आनंदाने उसळ्या मारत तो माझ्या गळ्यात पडला. आधीच माझ्या मनात खूप अपराधीपणाची भावना होती. त्यात त्यानं जी घट्ट गळामिठी घातली होती. त्यावरून तो स्वतःला किती एकटं समजत होता, याची मला जाणीव झाली. पण या वयातली मुलं थोडी जास्तच समजूतदार असतात, असं माझं अनुभवांती मत आहे

थोडा वेळ अंगाखांद्याशी खेळून झाल्यावर कृष्णा जरा बाजूला झाला. मग मी त्याला हळूच विचारलं, ''कृष्णा, काय रे केलंस तू एवढा वेळ एकटा घरात असताना? करमलं का तुला? तुझ्याशी गप्पा मारायला कुणीच नव्हतं ना? तर त्यानं सांगितलं, ''अगं, आई मी एकटा नव्हतोच. मी खूप गप्पा मारल्या, मजा केली''

मला जरा नवलच वाटलं. कदाचित शेजारचं कुणीतरी येऊन बसलं असेल तो एकटा आहे म्हणून असं वाटलं. तेवढ्यात तोच म्हणाला, ''अगं आई, तू नव्हतीस ना म्हणून मी आपल्या घराशी गप्पा मारल्या'' मला थोडं हसू आलं. तर तो म्हणाला ''मी खूप वेळा घराशी गप्पा मारतो'' मी म्हटलं, ''कसं काय?''

तर तो म्हणाला, 'तू घरात नसलीस की मला असं वाटतं की घर झोपलं असेल आणि घरात कुणीच नाही त्यामुळे शांतता आहे. त्याची झोपमोड नको व्हायला म्हणून मी थोडा वेळ ओट्यावर बसून राहतो. मग थोड्यावेळाने एक बेल वाजवतो. तेव्हा आपलं घर मला विचारतं, 'कोण आहे?'. मग मी सांगतो, 'मी तुझं बाळ आहे. माझं नाव कृष्णा आहे.' मग घर मला म्हणतं, 'अरे वा कृष्णा आलास का? आता लवकर माझं कुलूप काढ मग मला छान फिलींग येतं. मग मी कुलूप काढतो. तेव्हा घर मला म्हणतं ''वेलकम होम''. मी शूज न काढता, कपडे न बदलता तसाच सोफ्यावर लोळत पडतो. तेव्हा घर मला सांगतं 'कृष्णा, आईने शिकवलेय की नाही शूज घराबाहेर काढायचे, बाहेरून आल्या आल्या कपडे बदलायचे, हातपाय तोंड धुवायचे. मग मला कितीही कंटाळा आला असला तरी मी पटकन उठतो आणि शूज बाहेर काढून ठेवतो, कपडे बदलतो, हातपाय तोंड धुतो आणि मग सोफ्यावर बसतो. मग मी घराला विचारतो की 'आज आई घरात नव्हती मग तू एकट्याने काय केलंस?' तर घर मला सांगतं की 'मी खूप उन्हात उभा होतो पण तुझ्या टॉमला, जेरीला, डोरेमॉनला आणि नोबिताला कुणालाच ऊन लागू दिले नाही आणि कुणाला एकट्याला बाहेरही सोडलं नाही. मग मी घराला थँक्यू म्हणतो आणि घराची पापी पण घेतो.





सविता कारंजकर
(मो)९९२२८१४१८३

माझ्यासाठी हे सगळं नवीन होतं. मुळात मला असं वाटलं होतं की मी घरात नाही म्हणजे त्याची खूप वाईट अवस्था झाली असेल, तो रडत असेल, घाबरलेला असेल एकटेपण त्याला असह्य झालं असेल. पण प्रत्यक्षात असं काहीच नव्हतं.

त्याने त्याच्या कल्पनाशक्तीच्या जोरावर त्याचं स्वतःचं असं एक विश्व निर्माण केलं होतं. एकटेपणा, भीती यापासून हेच त्याचं कल्पनाविश्व त्याच्यासाठी संरक्षक ढाल बनलं होतं.

खरंतर आपल्या संस्कृतीत घराला जिवंत मानलंय. आपण सणासुदीला वास्तुपुरुषासाठी नेवैद्य पण बाजूला काढून ठेवतो. मला आठवतं आम्ही भावंड भांडू लागलो, एकमेकांबद्दल वाईट बोलू लागलो की आमची आजी-आई म्हणायच्या की घरात वाईट बोलू नये घर ऐकत असतं आणि मग ते तथास्तु म्हणतं. जसं तुम्ही म्हणता तसंच घडतं.

कृष्णानं घराशी गप्पा मारायची सवयच लावून घेतली होती, हे त्याच्या भावनिक बुद्धिमत्ता, एकटेपणावर मात करण्याचं कौशल्य आणि त्याची सुरक्षितता या सगळ्याची झलक होती.

माझ्याकडे शंकेच्या नजरेनं बघत त्यानं विचारलं, 'आई, तुला मी वेडा मुलगाय असं वाटतंय का?'

म्हटलं, ''अजिबात नाही, आपल्या प्रत्येक वस्तूला, आपल्या घराला असंच जपायचं असतं.'' माझे एवढेच शब्द त्याला आश्वासक वाटले आणि तो क्षणातच झोपी गेला. माझ्या विचारांची श्रृंखला तशीच सुरू राहिली. आईऐवजी आज तो घराच्या उबदार कुशीत स्वतः ला सुरक्षित समजत होता. घराला त्यानं मीठी मारली, पापी घेतली. किती निरलस, निरागस, शुद्ध भाव!

घरावर त्याचं प्रेम होतं आणि कृतज्ञतेची भावनाही त्याच्या मनात रुजली होती. घर आपल्याला ऊब देतं , आईच्या अनुपस्थितीत घर आपला सांभाळ करतं याबद्दलची कृतज्ञता त्यानं घराची पापी घेवून, घराला थँक्यू म्हणून व्यक्त केली होती. शिस्त लावण्यासाठी आईनं शिकवलेल्या गोष्टी, जसं की शूज बाहेर काढणं, हातपाय तोंड धुणं, कपडे बदलणं यांची आठवण त्याला घर करून देतं अशी त्यांची कल्पना होती म्हणजे घराच्या रुपात आई आपल्या जवळपास आहे, ती आपली काळजी घेतेय, ही त्याची भावना किती कोमल आहे ना!

पालक जेव्हा घरी नसतात तेव्हा मुलं मनातून त्यांच्याशी संवाद साधत असावीत. ही एक भावनिक सुरक्षा यंत्रणा आहे. यामुळे घराच्या प्रतिमेमध्ये प्रत्यक्षात आईचीच भूमिका दिसून येते. मार्गदर्शन करणारी, प्रेमाने लक्ष ठेवणारी, चांगल्या गोष्टी शिकवणारी.

या घटनेतून माझ्या लक्षात आलं की या वयात मुलं समोर आलेल्या परिस्थितीला सहजच स्वीकारतात, सहजासहजी जुळवून घेतात. पालकांना वाटतं तितक्या कठीण नसतात या गोष्टी. मुलांची कल्पनाशक्ती ही त्यांची भावनिक सुरक्षा बनते. ती त्यांना एकटेपणातून सावरते, मजबूत करते. विशेष म्हणजे जेव्हा कृष्णा माध्यमिक शाळेत होता तेव्हा त्याच्या पाठ्यपुस्तकात द.भा.धामणस्कर यांची वस्तू ही कविता होती. निर्जीव वस्तूंना भावना असतात, त्यांना जपायचं असतं अशा आशयाची ती सुंदर कविता आहे. ती मी त्याला शिकवत असताना आपणही लहानपणी घराशी गप्पा मारत असल्याची आठवण झाली होती. कृष्णाचा आणि माझाही हा अनुभव हे दाखवतो की प्रेम आणि संगोपन योग्य असेल तर मुलं परिस्थितीला सुंदर रूप देत स्वतःची भावनिक काळजी स्वतः घेऊ शकतात कधी कधी तर मोठ्यांपेक्षाही अधिक परिपक्वपणे.





# श्री पद्मनाभ स्वामी मंदिर तिरुव अनंत पुरम

**ज्योतिर्मय साहित्य**

या मंदिरावर टिपू सुलतान यानेही धनाच्या लोभाने हल्ला केला होता, पण मंदिराचे रक्षण करण्यास भक्तांना यश आले. आणि टिपू सुलतानाच्या प्रचंड सेनेचा नाश घडला, पण तो यशस्वी होऊ शकत नाही.

मंदिरातील प्रथा



मंदिरात प्रवेशासाठी वेशभूषांचे नियम कडक आहेत. यात पुरुषाने धोतर किंवा लुंगी व उपरणे व महिलांनी साडी किंवा सलवार-कमीज हे घालूनच मंदिरात प्रवेश करता येतो.

मंदिरातील उत्सव

१.अल्पासी उत्सव

अश्विन कार्तिक महिन्यात हा दहा दिवस चालणारा उत्सव आहे. वर्षभरात साजरा होणाऱ्या दोन मोठ्या उत्सवापैकी, हा एक आहे. यात कलशाभिषेक मूरजप (मंत्रोचार यज्ञ) नैवेद्य व नित्य पद्धतीची विस्तृत पूजा केली जाते. उत्सवाच्या शेवटी आरट्टू म्हणजेच स्नान समारंभ असतो. म्हणजे श्री पद्मनाभाची सुवर्ण मूर्ती हत्तीवर विराजमान केली जाते व मिरवणूक निघते आजही राजघराण्याचे सदस्य या मिरवणुकीत पायी चालत सहभागी होतात. देवाला शंखमुद्यम बीचवरील तळ्यात स्नान घातले जाते. स्नानानंतर परत येताना मंदिराचे दरवाजे राजघराण्याच्या वंशपरंपरेने उघडले जातात.

२.पैंकुनी उत्सव

हा चैत्र महिन्यात साजरा होतो. हा उत्सव दहा दिवस पर्यंत चालतो. या काळात मंदिरात पांडवांच्या पाच मूर्ती (बाळ कल्कू) म्हणून उंच करून उभारल्या जातात. मंदिरातील छत्र, ध्वज, वैदिक स्तोत्रपठण हे विशेष आकर्षण असते. या उत्सवाचा समारोपही आरट्टूनेच केल्या जातो.

३.कलशाभिषेकम्- भगवंताच्या मूर्तीवर नऊ विशिष्ट कलशा मधून विविध द्रव्यांनी जसे दूध, मध, तूप, नारळ पाणी चंदन, दही, उसाचा रस इत्यादी यांनी अभिषेक केल्या जातो वेद पंडित पाच सत्र व वैखानस अगम ओशास्त्राच्या प्रमाणे विधी केल्या जातो.

४.मूरजप- हा भव्य असा दुर्मिळ उत्सव आहे या दरम्यान ४७ दिवस सतत रोज वेदांचा जप होतो. ऋग्वेद यजुर्वेद सामवेद अशा तीनही वेद शाखांच्या क्रमाने जप होतो. हा उत्सव सहा वर्षातून एकदा होतो. याशिवाय लक्ष्मीनारायण पूजा, वैकुंठ एकादशी इत्यादी ही साजरे होतात.

संतांच्या भेटी - पद्मनाभाचे हे मंदीर अत्यंत पवित्र अशा दिव्य देसम म्हणून ओळखल्या जाणाऱ्या १०८ दिव्य मंदिरांपैकी एक आहे. या मंदिरास अनेक संत महंतांनी भेटी दिल्या आहेत. यात आद्य शंकराचार्य ,दिवाकर मुनी, चैतन्य महाप्रभू तुरुवांबादी कृष्णस्वामी असे प्रमुख संत आहेत दिवाकर मुनी यांची समाधी मंदिराच्या पश्चिमेस आहे.

पद्मनाभ मंदिरात कालभैरव, नाग, यक्ष, उग्र नरसिंह, गरुड यांचीही उपमंदिरे आहेत. भगवंताच्या या चिरंतन वास्तव्याच्या पवित्र स्थानास विनम्र होऊन वंदन करून हा भाग इथेच संपवू यात.

जय जय नारायण नारायण हरी हरी

***

# जीवन जगताना नवीन दृष्टिकोन देणारे ''अमृतवेल''


**ज्योतिर्मय साहित्य**

या कादंबरीतील पात्रे मिलिंद, दादा, माई, शेखर, दासबाबू, वसुंधरा गुप्ते, देवदत्त, मधुरा, पार्वती, गंगाधर , बापू, सावित्री, मोहन अशा अनेक पात्रांनी ही कादंबरी मोहक झालेली आहे. या कादंबरीचे केंद्रस्थान मात्र नंदा आहे.

नंदाचे शेखर सोबत लग्न ठरलेले असते.विमान अपघातात तो जातो. त्यानंतर नंदा आत्महत्येच्या विचाराने जे पाऊल उचलते पण दादा आणि माई यांच्या आठवणीने ती आत्महत्येच्या विचारापासून परावृत्त होते.

आपण ज्या गोष्टी कोणाला बोलू शकत नाहीत त्या आपण पत्राद्वारे एकमेकांना सांगू शकतो याचे सुरेख उदाहरण यातील पत्रांनी मनाला पटते. नंदाने दादांना लिहिलेले पत्र आणि दादांनी नंदाला लिहिलेले पत्र असे सुरेख नाते विचार पत्रातून व्यक्त होतात.

पी एच डी सुरू होण्यापूर्वी कंपनियन म्हणून नंदा वसुंधरा सोबत विलासपूरला जाते. तिचे दुःख ती पूर्ण विसरते. जग जाणून घेण्याच्या इच्छेत ती वसुंधरा आणि देवदत्त यांना मनाने जवळ आणण्याच्या हेतूने जे काही पाऊले उचलत होती त्यातून मानवी मनाचे दर्शन घडते. विविध भावनांच्या जाणिवांचे दर्शन होते.




देवदत्त यांचे विशाल ग्रंथालय वाचनाची आवड निवड , चंचल हरिणी सोबत साधलेला संवाद आत्म आक्रोश ज्यातील गूढता संदेश जो नंदाने ओळखला . समदुःखी एकाकी मन गुंततात

देवदत्त स्वतःच्या डायरीत लिहितो की वसू मिळण्या अगोदर नंदा का मिळाली नाही? इकडे नंदाला देखील मनोमन वाटत असते शेखर ऐवजी देवदत्त आपल्या आयुष्यात का आला नाही?

मानवी मनातील भाव भावनांचे सूक्ष्म तरंग आणि त्या नुसार पात्राची वर्तणूक अतिशय चपखल रीतीने मांडली आहे. अनेक प्रसंग आपल्या अवती भवती घडत आहेत असे वाटत राहते. मानवी मनाचे दोन प्रकार मुर्दाड मन आणि मनस्वी मन. आपण मुर्दाड होता जगू नये तर मनस्वी मन आत्मसात करून जगाव ही शिकवण आयुष्याला जिवंतपणाची दिशा देते.

हॅम्लेट आणि विवेकानंद यांच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव देवदत्त यांच्या विचारसरणीवर होता. वडिलांचे वीस वर्षांनंतर मिळालेले पत्र त्यातून आईच्या चारित्र्याची ओळख आणि त्यातून निर्माण होणारा तिरस्कार.. आई ची पत्रातून कबुली पैश्यासाठी ब्रह्मचर्य पाळण्याचा नियम जो देवदत्त यांच्या वडिलांनी आचरणात आणला. मुलाच्या हाती दारूचा प्याला देण्या मागील स्वार्थ भाव, शरीरसुखविना झालेली शरीराची विटंबना, त्यासाठी केलेला प्रयत्न , अनेक बाबींची गूढता उकल झाली. पत्रातून वडील जिवंत असून ते वेड्याच्या दवाखान्यात भरती असल्याचे सांगितले. त्यांनी आत्महत्या केली नव्हती. हे सत्य देवदत्त यांना कळते.

**पुस्तक परीक्षण**

**सौ. जयश्री अर्जुन मुंडे**
**अंबाजोगाई**

(क्रमशः)

# प्रोटीनयुक्त हेल्दी ब्रेकफास्ट

**ज्योतिर्मय साहित्य**

सकाळी सर्वांनाच झटपट आवरून डबे घेऊन नाश्ता करून ऑफिसला जाण्याची घाई असते. बर, दुपारी जेवण्याची वेळ उशीराची असते. त्यातून जबाबदारीचे काम असेल तर मग त्याला वेळच नसतो ठरावीक. म्हणून पोटभर आणि दिवसभर एनर्जी मिळेल असा मजबूत नाश्ता तरी करावा. खरंतर अशी सर्वांचीच इच्छा असते, पण तो बनवायला खूप वेळ लागतो,मग घाईघाईत काहीतरी रेडिमेड असेल ते फरसाण किंवा अगदीच नसेल तर ब्रेड, बटर, जाम खायचे आणि पळायचे. त्यात बायकांनाही हल्ली सर्व उरकून धावत पळत कसबसा डबा करून,भरून सर्वांचे सगळे झाल्यावर स्वतःचे आवरून पळायचे असते. अशावेळी त्यांना काय करावे हा तर प्रश्न असतोच,पण कमी वेळेत आणि जास्त ऊर्जा देणाऱ्या आणि त्यात टेस्टी बनणाऱ्या पदार्थांचा विचार करावा लागतो. तर आता एक मस्त डिश बनवा आणि सगळे प्रश्न चुटकिसरशी सोडवा.

**साहित्य :** १ वाटी रात्री भिजत टाकलेली मुगाची डाळ, अर्धी वाटी दही, २ चमचे रवा, २ चमचे पिठीसाखर, १ चमचा किंवा एक निळ्या रंगाचा इनो पाऊच, चवीनुसार मीठ, १ मोठ्ठा कांदा, २ टोमॅटो, ७..८ लसूण पाकळ्या, किंचीत आल्याचा तुकडा, कढीपत्ता, कोथिंबीर, १ चमचा तेल २ हिरव्या मिरच्या,१ चमचा लाल तिखट, वरून भुरभूरण्यासाठी चाटमसाला

**कृती :** प्रथम छान भिजलेली मुगाची डाळ उपसून पाणी काढून मिक्सरच्या भांड्यात घालावी. त्यात दही घालून ते मिक्सरमधून मस्त वाटून घ्यावे आणि ते एका बाऊल मध्ये काढून त्यात १ चमचा मिठ, रवा, चवीसाठी किंचीत हिंग, पिठीसाखर घालून व्यवस्थित फेटून ५..७ मिनिटे झाकून ठेवावे.

तोपर्यंत कांद्याच्या,टोमॅटोच्या फोडी करून त्या मिक्सरच्या भांड्यात घालाव्या. मग त्यातच आले, लसूण,हिरवी मिरची सर्व घालावे व छान पेस्ट बनवावी.




गॅसवर मोदक पात्र किंवा मोठी कढई ठेवून त्यात पाणी घालून ते गरम करण्यास ठेवावे . मग त्यात छोट्या.. इडलीचे पात्र असेल तर ते किंवा एक चाळणी पालथी ठेवावी. मग मोदकपात्रातील पाणी गरम झाले की तयार केलेल्या डाळीच्या बॅटर मध्ये इनो घालून हलकेच वर्तुळाकार फेटावे. मग त्या बॅटरचा एक चमचा चमचा पीठ इडलीपात्र किंवा चालणीवर घालून वरती झाकण ठेवावे. ५..७ मिनिटात मस्त वाफली जाऊन या मुगाच्या छोटया जाळीदार, हलक्या इडल्या बनतील. या तशाच सुद्धा मस्त लागतात हव्या तर केचप किंवा चटणी सोबत खाल्या तरी चालतात. पण आपण यांना आणखी थोडासा ट्विस्ट देऊन वेगळीच डिश बनवू.

आता कढई मध्ये एक चमचा तेलाची मोहरी, जिरे, किंचीत हळद, हिंग, कढीपत्ता घालून मस्त फोडणी बनवावी. नंतर त्यात आपण बनवलेली कांदा, टोमॅटोची प्युरी मिक्स करावी व ती छान परतावी. हवे तर किंचीत पाण्याचा शिपका द्यावा म्हणजे छान ओलसरपणा राहील. त्यानंतर त्यात इडल्या घालून व्यवस्थित सर्व इडल्यांना ग्रेव्ही लागेल असे पहावे. शेवटी वरून मस्त हिरवीगार कोथिंबीर घालून थोडेसे परतावे आणि सर्व्हिंग प्लेट मध्ये सर्व्ह करावे. आवडतं असेल तर वरून किंचीत

चाट मसाला भुरभूरावा. त्यामुळे जास्त चटपटीत टेस्ट लागते.


**वैशिष्टय**


यात दह्याच्या ऐवजी आपण १ चमचा लिंबाचा रस सुद्धा वापरू शकतो. बॅटर तयार करताना तो घालावा.पण दह्यामुळे इडली खूप सॉफ्ट बनते.

पिठीसाखरेमुळे किंचीत गोडसर चव खूप मस्त लागते. टोमॅटोची किंचीत वेगळीच टेस्ट, कांदा, आले, लसूण यांचा किंचीत उग्र पण टेस्टी चव येते तर चाटमसाल्याची बातच् न्यारी!

ही डिश पौष्टीक, भरपूर प्रोटीनयुक्त, तेल किंचीत वापरलेली असल्याने डाएटसाठी, आरोग्यासाठी उत्तम आहे.आणि सर्व चवी एकत्र मिक्स असल्यामुळे टेस्ट सुद्धा भन्नाटच असते. याच प्रमाणे हिरव्या मुगाची पण डिश सुरेखच लागते.






# स्वातंत्र्यलढ्यातील अध्वर्यु बॅरिस्टर अत्तावार यल्लप्पा

**ज्योतिर्मय साहित्य**
**(मागील अंकावरून)**

बॅरिस्टर में अत्तावार यल्लप्पा हे बँक स्थापनेपुरते मर्यादित नव्हते. आयएनए च्या रसद, निवास, प्रशिक्षण सुविया विशेषतः राणी रेजिमेंटसाठी जागा याची व्यवस्था त्यांनी आपल्या व्यावसायिक संबंधांचा वापर करून केली. नेताजी सप्ताह, मोठे देणगी संकलन कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रीडा स्पर्धा, चित्रपट शो या सर्वांचे आयोजन हे यल्लप्पा यांच्या मुख्य कामांपैकी होते. ज्यामुळे बँकेकडे आणि आयएनए कडे मोठ्या प्रमाणावर निधी आला. मलाया व सिंगापूरमधील भारतीय सैनिक व स्वयंसेवक यांना भाषा समस्या असूनही आझाद हिंद सरकारसाठी सहजपणे मिसळून घेण्यासाठी यल्लप्पा व त्यांच्या सहका–यांनी समन्वयक म्हणून महत्वाची भूमिका बजावली. काही ऐतिहासिक नोंदीमध्ये श्री. ए. यल्लप्पा यांचा तज्ञ व्यक्ती म्हणून आझाद हिंद सरकारच्या विस्तारित रचनेत उल्लेख दिसतो म्हणजेच, औपचारिकपणे सरकारच्या संरचनेत सह–नियुक्त सदस्य म्हणून स्थान दिले गेले होते. महायुध्दात जपानचा पराभव आणि ब्रिटिशांचे सिंगापूर–मलाया भागात आगमनाच्या काळात आयएनए च्या जखमी सैनिकांचे व नागरी समर्थकांचे सुरक्षित स्थलांतर करणे, रुग्णालये व शिबिरे रिकामी करणे या कामासाठीही नेताजी यांनी त्यांना उत्तरेत पाठविण्यात आल्याच्या नोंदी आढळतात. युध्दाची दिशा बदलत असताना बँकेच्या ठेवी, दागदागिने, आयएनए चा खजिना यासाठी आझाद हिंद बँकेचे प्रमुख प्रशासक किंवा बँक गव्हर्नर म्हणून जबाबदारी देण्यात आली होती.

आयएनए आणि आझाद हिंद सरकारच्या इतिहासाच्या अभ्यासक लक्ष्मी सहगल, एस.ए. अय्यर, पीटर इत्यादींच्या लिखाणातून यल्लप्पा यांची प्रतिमा ‘‘नेताजींचा अत्यंत विश्वासू, काम पूर्ण करून दाखवणारा निस्वार्थी आणि अदृष्य राहणारा संघटक‘‘ अशी दिसून येते. राजकीय विचारसरणीपेक्षा कार्यक्षम व्यवस्थापन, वित्त, लॉजिस्टिक्स, कायदा या क्षेत्रातील त्यांची पकड अधिक ठळक दिसते. त्यामुळे त्यांना ‘‘व्यवस्थापक क्रांतीकारक‘‘ म्हणावे असे यल्लप्पा म्हणत असत. आझाद हिंद बँकेसारख्या प्रयोगातून स्वातंत्र्यापूर्वीच आझाद हिंद सरकारच्या माध्यमातून स्वतःची वित्तीय संस्था उभी करून युद्ध चालविल्याची ऐतिहासिक नोंद भारतीयांनी केली असून यामध्ये बॅरिस्टर अत्तावार यल्लप्पा यांचा वाटा महत्वाचा आहे.जून १९४५ मध्ये ब्रम्हदेशातल्या एका ग्रामीण प्रदेशात शत्रूच्या हवाई हल्ल्यात जखमी होऊन दुर्दैवी अंत त्यांचा झाला त्यावेळी त्यांचे वय फक्त तेहतीस वर्षाचे होते. मृत्यूपूर्वी ते आझाद हिंद सेनेच्या रसदीवर देखरेख करीत होते.

सिंगापूरमधल्या इंडियन इंडिपेंडन्स लीग मध्ये स्त्रीयांची संघटना होती. यल्लप्पा यांनी प्रस्तावित पलटणीविषयी स्त्री संघटनेच्या प्रमुख सौ.चिंदबरम आणि डॉ. लक्ष्मी स्वामिनाथन यांच्याशी चर्चा करून १२ जुलै १९४३ रोजी नेताजींसाठी पहिला गार्ड ऑफ ऑनर करायला त्यांना मदत केली होती. याप्रसंगी कसून संचलन करताना ३०३ ली–एनफील्ड या जड रायफल्सचा वापर नेताजींच्या प्रेरणेने सर्व स्त्री सैनिकांनी केला व पुढेही त्या करीत होत्या. या कार्यक्रमासाठी भरती झालेल्या राण्यांच्या जोडीला प्रचंड संख्येने स्त्रीया उपस्थित होत्या. तेंव्हा नेताजींनी भाषणात आझाद हिंद सेने च्या स्त्री सैनिकांना इतिहासातल्या दोन लढाऊ स्त्रियांच म्हणजेच भारतातल्या राणी लक्ष्मीबाई आणि फ्रान्सच्या जोन ऑफ आर्क यांचे अनुकरण करण्याचे आवाहन केले होते. काही दिवसांतच राणी पलटणीत भरती झालेल्या स्त्रीयांची संख्या वाढून पन्नासवर गेली आणि ती वाढतच राहिली. त्यानंतर राणी पलटणीतल्या ३०० स्त्रीया राहू शकतील आणि त्यांना प्रशिक्षण देता येईल अशा बराकींची व्यवस्था यल्लप्पा यांनी सिंगापूरमध्ये केली. यथावकाश ६०० स्त्रीयांना या छावणीत प्रशिक्षण देण्यात आले. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी आझाद हिंदच्या हंगामी सरकारची घोषणा नेताजींनी केली आणि २२ ऑक्टोंबर १९४३ रोजी नेताजींनी औपचारिकरित्या या छावणीचं उद्घाटन केले. लक्ष्मी स्वामिनाथन या आझाद हिंद च्या हंगामी सरकारच्या युद्धकालीन कॅबिनेटमध्ये स्त्रीसंघटनेच्या मंत्री झाल्या होत्या. या राणी पलटणीच्या बराकी जिथं होत्या तिथं आज सिंगापुर मॅनेजमेंट युनिव्हर्सिटी ची मुख्य इमारत उभी आहे. सध्याच्या सिंगापूर आर्ट म्युझियमच्या मैदानावर या स्त्रीयांना प्रशिक्षण देण्यात आलं होत. दोन्ही



ठिकाणं सिंगापूरच्या मध्यवर्ती भागात ब्रास बसाह जिल्ह्यात आहेत. या स्त्रीयांना प्रशिक्षण देणाऱ्या आयएनए अधिका–यांनी स्त्रीयांकडे भगिनी म्हणून पाहावं असं नेताजींनी ट्रेनिंग देण्याऱ्या अधिकाऱ्यांच्या मुलाखती घेऊन त्यांना सांगितल होतं. आझाद हिंद सेने च्या पुरुष सैनिकांमध्ये लिंग समतेच आणि आदराचं नीतिमुल्य रूजवण्यात नेताजी लक्षणीयरित्या यशस्वी झाले असं लक्ष्मी स्वामिनाथन सांगतात. पुढे ब्रम्हदेशातल्या खडतर काळात आणि विशेषतः १९४५ सालच्या अखेरच्या काही महिन्यांमध्ये आझाद हिंद सेने तील पुरुष आणि महिला दोघांनाही खडतर परिस्थितीत एकत्र कार्य करावं लागलं. एकमेकांना संपूर्ण सहकार्य करत, एकही अप्रिय घटना न घडता त्यांनी सहजपणे काम केलं.

झाशीची राणी पलटण तयार झाली तेव्हा नेताजींना जपानी लोकांनी बराच विरोध केला. यल्लप्पांनी जुलै १९४३ च्या नेताजी यांच्या आगमनाप्रीत्यर्थ एक स्वागत समिती तयार केली होती. या समितीत त्यांनी स्त्रीयांचा समावेश करून पाहिला तेंव्हा जपानी लोकांनी त्याला हरकत घेतली, परंतु यल्लप्पा बधले नाहीत. जपानी लोकांनी आणि विशेषतः त्यांच्या वरिष्ठ लष्करी अधिका–यांनी जेव्हा झाशीची राणी पलटणीविषयी ऐकलं तेंव्हा ते आश्चर्याने थक्क झाले. स्त्री सैनिक बाळगण्याचा प्रस्ताव त्यांना खुळचटपणाचा वाटत होता. त्यांना प्रशिक्षण देणे म्हणजे दारुगोळा वाया घालवणं आहे असं त्यांना वाटत होतं. झाशीची राणी पलटण एकदा सुरू झाल्यावर त्यांना लक्ष्य साधण्याचा सराव करताना बघायला जपानी अधिकारी मधूनच कुतूहलानं सिंगापुर छावणीच्या गोळीबार मैदानावर चक्कर मारत. या सर्व स्त्रीया नेमबाजीत आणि संगिनी चालवण्यातदेखील चांगल्या माहिर होत असल्याचं त्यांनी काहीशा नाइलाजानंच कबूल केल.

बॅरिस्टर अत्तावार यल्लपा यांच्या जन्म शताब्दी निमित्त मध्ये मंगलोरमध्ये मोठ्या उत्साहाने तीन दिवसीय (४ ते ६ मे) २०१२ रोजी एम कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या उत्सवांचे आयोजन ‘बॅरिस्टर अत्तावार यल्लप्पा समितीने ’ केले. कार्यक्रम कर्नल यू. सुंदर राव सभागृहात सुरू झाला. येथे यल्लप्पा यांचे चित्र अनावरण करण्यात आले. ६ मे रोजी रविवारी जोती सर्कलपासून नेहरू मैदानापर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली. नेताजी सुभाषचंद्र बोस सभागृहात मुख्यमंत्री डी. व्ही. सदानंद गौडा यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. न्यायमूर्ती संतोष हेगडे यांनी अध्यक्षस्थान भूषवले, तर माहे विद्यापीठाचे निवृत्त कुलगुरू डॉ. बी. एम. हेगडे यांनी प्रास्ताविक केले. केंद्रीय कॉर्पोरेट कार्यमंत्री डॉ. एम. वीरप्पा मोइली यांनी सोव्हरिनचे प्रकाशन केले. भगतसिंग यांचे पुतणे प्रो. जगमोहन सिंग, नेताजींचे पुतणे बोस, अदील शहा नवाज व त्यांची पत्नी महाबिन शहा नवाज, पूर्णिमा ढिल्लन,नेताजी संशोधन फौंडेशनचे अध्यक्ष व्ही. पी. सैनी, फॉरवर्ड ब्लॉक कर्नाटकचे






प्रमुख शिवशंकर आणि कॅप्टन डॉ. लक्ष्मी सहगल यांनी सहभाग घेतला.

प्रमुख नेत्यांची भाषणे आणि संदेश वाचन तसेच मुख्यमंत्री सदानंद गौडा यांनी यल्लप्पा यांना ‘ हीरो’ म्हणून संबोधले आणि त्यांच्या आझाद हिंद बँक स्थापनेतील योगदानावर प्रकाश टाकला. डॉ. वीरप्पा मोइली यांनी ‘‘भारतीयांनी येल्लप्पांकडून देशभक्तीचे मूल्ये शिकावीत,’’ असे सांगितले आणि त्यांच्या नेताजींशी असलेल्या जवळीकीवर भर दिला. डॉ. कल्लडका प्रभाकर भट यांनी स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या त्यागाचे कौतुक केले, तर न्यायमूर्ती संतोष हेगडे यांनी त्यांच्या कायदेशीर कौशल्याबद्दल उल्लेख केला. स्वातंत्र्यसैनिकांचा सन्मान करताना दक्षिण कन्नड जिल्ह्यातील अनेक ज्येष्ठ सैनिकांना सन्मानित करण्यात आले. पूर्णिमा ढिल्लन यांनी आपल्या सासऱ्यांच्या (जी.एस. ढिल्लन )मधील सहकाऱ्यांबद्दल बोलताना येल्लप्पा यांच्या भूमिकेचे महत्त्व अधोरेखित केले. लक्ष्मी सहगल यांनी महिलांच्या मधील सहभागाबरोबरच येल्लप्पा यांच्या संघटन कौशल्याची प्रशंसा केली.


उत्सवांचे वैशिष्ट्य म्हणजे या जन्मशताब्दी उत्सवात मिरवणुकीत हजारो लोक सहभागी झाले.नेताजींच्या प्रतिमा, आझाद हिंद बँकेच्या नोटा आणि ध्वजांचा वापर करण्यात आला. समितीचे सरचिटणीस सुरेश कटील यांनी सांगितले की, येल्लप्पा यांनी म्यानमार, हाँगकाँग, सिंगापूरमधून देणग्या गोळा करून स्वातंत्र्यलढ्याला आर्थिक बळ दिले.या उत्सवांनी येल्लप्पा यांना ‘अनसंग हीरो’ म्हणून पुन्हा ओळख दिली. स्थानिक राजकीय नेत्यांसह राष्ट्रीय पातळीवरील सहभागामुळे हा उत्सव प्रादेशिक पातळीवरून राष्ट्रीय चर्चेचा विषय बनला. डेक्कन हेराल्ड, कोस्टल डायजेस्ट, दैजिवर्ल्ड आणि मंगलोर टुडे यांसारख्या वृत्तपत्रांनी याचे विस्तृत वृत्तांकन केले. यामुळे तरुण पिढीला च्या आर्थिक बाजूची माहिती मिळाली आणि आझाद हिंद बँकेच्या वारशाला नवसरण मिळाले. या जन्मशताब्दी उत्सवाने यल्लप्पा यांच्या कुटुंबाला आणि मंगलोरवासियांना अभिमान वाटला. त्यांच्या जन्मशताब्दीच्या या कार्यक्रमांनी स्वातंत्र्यलढ्यातील दक्षिण भारताच्या योगदानाला उजागर केले आणि भविष्यातील संशोधनाला चालना दिली.


## कवितेच्या लाटावर...





## कवितेच्या लाटावर...















हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559